# 'एमक्यूअर फार्मा'च्या महसुलात १७ टक्के वाढ

**पुणे, ता. १६ :** औषधनिर्माण क्षेत्रातील कंपनी 'एमक्यूअर फार्मास्युटिकल्स'ने ३० जून २०२४ रोजी संपलेल्या चालू आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत उत्तम कामगिरी केली आहे. कंपनीने १५३ कोटी रुपये करोत्तर नफा मिळवला असून, त्यात वार्षिक ८.२ टक्के वाढ नोंदवली आहे. महसुलातही वार्षिक १६.६ टक्के वाढ नोंदवत, १,८१५ कोटी रुपयांचा महसूल मिळवला आहे.

कंपनीने वार्षिक १४ टक्के वाढीसह देशांतर्गत व्यवसायातून ९०९ कोटी रुपयांची कमाई केली असून, वार्षिक १९.५ टक्के वाढीसह आंतरराष्ट्रीय व्यवसाय ९०६ कोटी रुपये आहे. व्यवसायातील उत्तम कामगिरी आणि 'सनोफी'च्या कार्डिओव्हस्कुलर ब्रँडसाठी वितरण भागीदारीमुळे एकूण महसुलात ५० टक्के प्रमाण असलेला कंपनीचा देशांतर्गत व्यवसाय १४ टक्क्यांनी वाढला आहे. कॅनडामध्ये, उपकंपन्या मार्कन व मंत्रा यांनीही चांगली कामगिरी केली आहे.

''एमक्युअर'ने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही व्यवसायात केलेल्या गुंतवणुकीचे फायदे आता दिसत आहेत. 'सनोफी' आणि कॅनडातील 'मंत्रा' आता 'एमक्युअर'मध्ये पूर्णपणे सामावून गेल्या असून, आता देशांतर्गत व्यवसाय वाढवण्यावर आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आमच्या उत्पादनांच्या सादरीकरणाला गती देण्यावर आमचा भर आहे,'' असे कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक सतीश मेहता यांनी सांगितले.